झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा/प्र.क्र.२०६/झोनिआ/२६४/२०१८.
दिनांक :- २०/०६/२०१८.

# "झोपडपट्टी निर्मुलन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये महाराष्ट्र शासनाने, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि. ३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करणेत आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचिमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे उक्त अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांनी दि.२८/०९/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे गलिच्छ वस्ती / झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, सि.स.नं.७२१ स.नं.८८/४+१३८+१६१ प्लॉट क्र. ५४,५५,५६ गुजरात कॉलनी कोथरुड क्षेत्र ३२०८.९८ चौ.मी. या विकसक मे. यश बिल्डकॉन यांचे मालकीच्या क्षेत्रावर पुनर्वसन करून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी उक्त विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्वसन प्रस्ताव दाखल केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (वाय) मधील तरतूदीनुसार झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चित करुन त्याबाबतची अंतिम यादी (परिशिष्ट - २) तयार करण्याचे अधिकार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना प्रदान केलेले आहेत. त्या अनुषंगाने तहसिलदार तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडीधारकांची पात्रता यादी (परिशिष्ट-२) दि.२९/०५/२०१७ रोजी निश्चित केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट-२ नुसार सदर जमिनीवर एकूण १३१ झोपडया असून त्यापैकी पात्र निवासी ८१, पात्र बिगर निवासी ४, या प्रमाणे एकुण ८५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी १००% झोपडीधारकांनी विकसक मे. यश बिल्डकॉन यांना पुनर्वसनास संमती दिलेली आहे;



Scanned with CamScanner

आणि ज्याअर्थी, पुणे, सि.स.नं.७२१ स.नं.८८/४+१३८+१६१ प्लॉट क्र. ५४,५५,५६ गुजरात कॉलनी कोथरुड क्षेत्र ३२०८.९८ चौ.मी. ही मिळकत झोपडपट्टी पुनर्वसन आदेश उक्त अधिनियमाचे कलम ३ (क) अन्वये जा.क्र.झोपुप्रा/तां.१/झोपुआ/प्र.क्र.२०६/१५३०/१७ दि. २८/०९/२०१७ नुसार पारित करणेत आला आहे आणि सदर आदेश स्थानिक वृत्तपत्रात महाराष्ट्र टाईम्स दि.०३/१०/२०१७ रोजी आणि महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०५ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०१७, पान क्र. ०६ भाग १ पुरवणी वर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे हा ३ क आदेश दि. ०३/१०/२०१७ रोजी झोपडपट्टी क्षेत्रातील जागेवर डकविण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहीत पध्दतीने प्रसिध्द झाला असुन विहीत कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही व विशेष न्यायाधिकरणाकडे अपिलही दाखल झालेले नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून जमिन खुली करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम १९७१ या मध्ये सन २०१८ च्या महा. ३८ या अधिनियमान्वये सुधारण करुन उक्त अधिनियम दि. २६/०४/२०१८ आंमलात आला असल्याने उक्त अधिनियमातील सुधारित कलम ३ ड अन्वये पुढील कारवाई करणे अनिवार्य आहे ;

त्याअर्थी, मी पांडुरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे उक्त अधिनियमाचे (सुधारणा अधिनियमामधील तरतुदीनुसार) कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' म्हणुन घोषित करीत आहे आणि पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

i) उक्त क्षेत्रामधील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी त्यांची झोपडी ३० दिवसांचे आत रिकामी करून विकसकाच्या ताब्यात दिली पाहिजे.

ii) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे.

सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

१. सदर आदेशापासून किमान ५० दिवसांच्या आंत विकसकाने निर्मुलन करून क्षेत्र खाली केले पाहिजे.
२. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजुर करुन प्रत्यक्ष बांधकाम सुरु केले पाहिजे.
३. विकसकाने योजनेचे काम चालु करणेपूर्वी विस्थापित होणा-या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यत्या त्या सर्व सुविधांसह स्व:खर्चाने केली पाहिजे.
४. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात सोई सुविधांसह पूर्ण केले पाहिजे.
५. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे



Scanned with CamScanner

६. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारुन मुदतवाढ देण्यात येईल.

७. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.

८. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा / गाळयांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबीर रिकामे केले पाहिजे.

९. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत उक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं.७२१ स.नं.८८/४+१३८+१६१ प्लॉट क्र. ५४,५५,५६ गुजरात कॉलनी कोथरुड,पुणे. | ३२०८.९८ चौ.मी | **पुर्वेस -** लागू व न.भू.क्र. ७२१ पैकी |
| | | **पश्चिमेस -** न.भू.क्र. ७२१ पैकी प्लॉटक्र. ५३ |
| | | **उत्तरेस -** रस्ता |
| | | **दक्षिणेस -** न.भू.क्र. ७२१ पैकी प्लॉट क्र. ५२ |

सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

**(पांडुरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

**दिनांक :-** २०/०६/२०१८

E/3 D/adesh



Scanned with CamScanner